# आचार संहिता





VESUVIUS

## 8 प्रमुख क्षेत्रांचा समावेश होतो

आमच्या आचार संहितेमध्ये 8 प्रमुख क्षेत्रांचा समावेश होतो:

01 आरोग्य, सुरक्षितता आणि पर्यावरण

02 व्यापार, ग्राहक, उत्पादने आणि सेवा

03 लाचलुचपत व भ्रष्टाचार-विरोधी

04 कर्मचारी आणि मानवाधिकार

05 प्रकटन आणि गुंतवणूकदार

06 प्रशासन, समाज आणि स्थानिक समुदाय

07 स्वारस्याचा संघर्ष

08 स्पर्धक

# 01

## आरोग्य, सुरक्षा आणि पर्यावरण

आरोग्य, सुरक्षितता आणि पर्यावरणाचे विषय ह्या प्रमुख प्रवाहाच्या व्यवस्थापकीय जबाबदार्या आहेत. आमचे कर्मचारी, ग्राहक, पुरवठादार, कंत्राटदार, पाहुणे आणि सर्वसाधारण जनता आणि आमच्या प्रचालनांमुळे प्रभावित होणारे इतर यांच्या आरोग्य व सुरक्षिततेचे आम्ही संरक्षण करू. आरोग्य, सुरक्षितता आणि आमच्या प्रचालनांचे पर्यावरण घटक यांच्याबाबतच्या सार्वजनिक चिंता विधायकपणे सोडवल्या गेल्याच पाहिजेत.

आम्ही हे करू:

- सर्व कर्मचाऱ्यांसाठी आरोग्यपूर्ण, सुरक्षित आणि कामाच्या सुरक्षायुक्त परिस्थिती प्रदान करू.
- आमच्या आरोग्य, सुरक्षितता आणि पर्यावरणीय वचनबध्दता आणि दायित्वांची पूर्तता करण्यासाठी पुरेशी मानवी आणि भौतिक साधनसंपत्ती पुरवू.
- नवीन उत्पादने आणि प्रक्रिया यांच्या पर्यावरणावर होऊ शकणाऱ्या प्रभावाचा विकासाच्या स्थितीमध्येच लवकर विचार करू.
- मानवी आरोग्य किंवा पर्यावरण यावर विपरीत परिणाम करणारे घटक कमीत कमी ठेवू, ते सुरक्षित करु किंवा शक्य असल्यास ते मुक्त होण्यास प्रतिबंध करू.
- साहित्य, उर्जा आणि इतर साधनसंपत्तीचा काळजीपूर्वक वापर करून कचरा कमी करू आणि पुर्नवापराच्या जास्तीत जास्त संधी निर्माण करू.
- अल्कोहोल आणि अंमली पदार्थ सेवनाशी संबंधित जोखमींपासून मुक्त कामाचे वातावरण प्रदान करू.

### + अधिक माहिती

या तत्वांना वेसुविअस आरोग्य, सुरक्षितता आणि पर्यावरण धोरणांचे समर्थन आहे, ज्यांचे, वेसुविअससाठी काम करणार्या प्रत्येकाने पालन केलेच पाहिजे.

# 02

## व्यापार, ग्राहक, उत्पादने आणि सेवा

आमचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी दीर्घकालीन, सकारात्मक ग्राहक संबंध आवश्यक आहेत. विद्यमान आणि संभाव्य ग्राहक आणि एजंट्स, वितरक, पुरवठादार आणि इतर व्यावसायिक सहयोग्यांसह व्यवहार करताना आपण सचोटीबाबत निःशंक नावलौकिक जपलाच पाहिजे, त्यांच्याशी रास्त, सातत्यपूर्ण आणि परस्पर सन्मान व विश्वास यावर आधारीत योग्य वर्तन केलेच पाहिजे.

आम्ही हे करू:

- विश्वसनीय, सुरक्षित आणि ग्राहकांच्या गरजांची पूर्तता करणारी उच्च दर्जाची उत्पादने सातत्याने प्रदान करू.
- उच्च दर्जाची, विश्वसनीय विक्री-पश्चात सेवा प्रदान करू.
- वेसुविअसबाबत स्पष्ट, संक्षिप्त आणि उपयुक्त माहिती पुरवू आणि आमच्या उत्पादने आणि सेवांबाबत खोटी किंवा दिशाभूल करणारी विधाने करण्यापासून दूर राहू.
- स्वारस्याचे संघर्ष, भेटवस्तू आणि लाच याबाबत समूह धोरणांचे पालन करण्यासह सर्व व्यावसायिक व्यवहार अंतर राखून करू.
- इतरांच्या गोपनीय माहितीचे संरक्षण करू आणि अशी माहिती केवळ ज्या उद्देशाने प्रदान केलेली आहे त्यासाठीच वापरू, कोणत्याही अयोग्य व्यावसायिक उपक्रमांसाठी किंवा वैयक्तिक लाभासाठी वापरणार नाही.



# 03

## लाचलुचपत व भ्रष्टाचार-विरोधी

आमच्या व्यवसायाच्या प्रचालनामध्ये आम्ही कोणत्याही प्रकारच्या भ्रष्ट पध्दती सहन करणार नाही.

हे साध्य करण्यासाठी:

- वेसुविअसचा कोणताही कर्मचारी किंवा वेसुविअसच्या वतीने काम करणारी कोणीही व्यक्ती किंवा अन्यथा त्यांचे प्रतिनिधीत्व करणारी कोणतीही व्यक्ती, एजंट्स, पुरवठादार, संयुक्त मोहिमेचे भागीदार किंवा इतर हे लाच म्हणून किंवा कोणताही अयोग्य व्यावसायिक लाभ निश्चित करण्यासाठी पुरवठादार किंवा सरकारी प्रतिनिधींना पैसे किंवा कोणतीही मूल्यवान गोष्ट प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे देऊ करणार नाही.
- आपल्या किंवा दुसर्याच्या व्यक्तिगत सुरक्षिततेला जोखीम निर्माण झाल्याशिवाय, आम्ही कोणतीही सुलभीकरण अदायगी देणार नाही.
- मनोरंजनातील आमचा सहभाग आणि आदरातिथ्य देऊ करणे हे नेहमी सामान्य व्यावसायिक उपक्रमाचा, सर्व संबंधित परिस्थितींचा विचार करून असेल, प्रमाणाशीर व योग्य वाजवी भाग असेल आणि त्यातून भ्रष्ट उद्देशाचा वास येणार नाही.

**+ अधिक माहिती**

या तत्वांना आमच्या लाचलुचपत व भ्रष्टाचार-विरोधी धोरणांचे आणि संबंधित समूह-व्यापी अनुपालन उपक्रमांचे समर्थन आहे.

# 04

## कर्मचारी आणि मानवाधिकार

कर्मचार्यांना विश्वासपूर्वकआणि व्यक्तीच्या प्रतिष्ठेचा मान राखून वागविले गेले पाहिजे. वेसुविअस जेथे प्रचालन करते तेथे आंतरराष्ट्रीय मानवाधिकार मापदंड मान्य करते आणि आपल्या प्रचालनांमध्ये बालमजूर किंवा वेठबिगारांचा वापर सहन करणार नाही.

आम्ही हे करू:

- आमच्या कर्मचार्यांचे म्हणणे काळजीपूर्वक ऐकू आणि त्यांना उत्पादकता, कामाची गुणवत्ता आणि रोजगाराच्या स्थितींमध्ये सुधारणा करण्यामध्ये सामावून घेऊ.
- नियुक्ती, प्रशिक्षण, बढती, करियर विकास, नोकरीवरून काढून टाकणे आणि यासारख्या रोजगाराशी संबंधित समस्या न्याय्य, पारदर्शक आणि व्यक्तिगत क्षमता, यशसिद्धी, अनुभव आणि आचरण यावर आधारीत असतील आणि वंश, वर्ण, राष्ट्रीयत्व, संस्कृती, वांशिक मूळ, धर्म, लिंग, लैंगिक प्रमूळ, वय, अपंगत्व किंवा नोकरीच्या कामगिरीशी संबंधित नसलेल्या कोणत्याही अन्य कारणाशी संबंधित नसतील किंवा लागू कायद्याने प्रतिबंधित नसतील याची खात्री करू.
- भेदभाव किंवा छळ सहन करण्यास नकार.
- कामाचे असे वातावरण पुरव जे आमच्या कर्मचार्यांचे शारीरिक किंवा मानसिक कल्याण यांवर नकारात्मक परिणाम करणार नाही.
- कर्मचाऱ्यांना त्यांची कौशल्ये आणि अनुभवाच्या प्रमाणात आणि व्यवसायाच्या यशानुसार व्यवहार्य असा कामाचा मोबदला देऊ.
- कर्मचारी आणि समूहाची दृष्टी, ध्येये आणि योजना बाधित होतील अशा महत्वाच्या घडामोडींची त्यांना माहिती दिली जाईल.
- कर्मचार्यांशी खुला, प्रामाणिक आणि सन्मानपूर्वक संवाद साधू.
- कामाशी संबंधित विवादांचे निराकरण करण्यासाठी परिणामकारक पद्धती-प्रक्रिया कायम राखल्या जातील.
- कर्मचार्यांच्या नोंदी गोपनीय ठेवू आणि केवळ कायदेशीर व्यावसायिक उद्देशांसाठीच वैयक्तिक माहिती जमा करू, वापरू किंवा उघड करू.

**+ अधिक माहिती**

या तत्वांना आमच्या कर्मचारी धोरणांचे आणि आमच्या मानवाधिकार धोरणाचे समर्थन आहे.

# 05

## प्रकटन आणि गुंतवणूकदार

वेसुविअसची मालकी त्यांच्या भागधारकांकडे आहे. आम्ही आमचा व्यवसाय जबाबदार पध्दतीने करू, त्यात शाश्वत आणि फायदेशीर वाढ होते आणि भागधारकांना मूल्य प्रदान करता येतील हे पाहू. साधनसंपत्तीचा समंजस व परिणामकारक वापर करून समूहाच्या मालमत्तेचे संरक्षण व संवर्धन करण्यासाठी विशेष काळजी घेतली जाईल.

आम्ही हे करू:

- नियंत्रणांच्या भक्कम प्रणालीने समर्थित अशा रीतीने लेखापुस्तके आणि नोंदी राखू की ज्यामध्ये हाती घेतलेले व्यवहार आणि व्यवसायाची आर्थिक स्थिती अचूकपणे आणि न्याय्यपणे नोंदवलेली असेल.
- गुंतवणूकदारांना नियमितपणे आणि वेळोवेळी, समूहाच्या स्थितीबाबत सहजपणे समजणारी अचूक आर्थिक माहिती आणि संतुलित मूल्यांकन देऊ.
- कॉर्पोरेट शासकीयतेबाबतच्या सर्वोत्तम पध्दतींमध्ये सहभागी होऊ.
- शासकीयता किंवा समूहाच्या व्यवसायाबाबत गुंतवणूकादारांच्या प्रश्नांची स्पष्टपणे उत्तरे देऊ.
- सर्व गुंतवणूकदारांना सातत्यपूर्ण आणि रास्त वागणूक देऊ आणि इतर गुंतवणूकदारांना बाजूला टाकून एखाद्या गुंतवणूकादारास किंवा गुंतवणूकादारांच्या एखाद्या गटाला फायदा करून देण्यापासून दूर राहू.
- आमची कर्तव्ये पार पाडण्यात; आमचे सल्लागार आणि लेखापाल यांच्याबरोबरच्या पत्रव्यवहारात; आणि गुंतवणूक समुदायाबरोबरच्या संपर्कात प्रांजळ, प्रामाणिक आणि व्यावसायिक राहू.
- जाहीर केली जातपर्यंत सर्व अंतर्गत माहिती गोपनीय राखू आणि वेसुविअसचे शेअर्स विकण्यासाठी किंवा इतरांना अशा उद्देशांसाठी वापरता येईल अशा प्रकारे कधीही वापरणार नाही.

**+ अधिक माहिती**

ही तत्वे आमच्या शासकीयता धोरणे, वित्तिय अहवाल धोरणे आणि कंपनीच्या रोखे व अंतर्गत माहिती हाताळण्याबाबतची धोरणे यांद्वारे समर्थित आहेत.

# 06

## प्रशासन, समाज आणि स्थानिक समुदाय

आम्ही जेथेही व्यवसाय करतो तिथे एक चांगले कॉर्पोरेट नागरिक बनण्याचा प्रयत्न करतो. राजकीय कृती-कार्ये आणि कर अदायगीशी संबंधीत यांच्यासह सर्व राष्ट्रीय आणि स्थानिक कायदे, नियम आणि नियमनांचे आम्ही पालन करू.

आम्ही हे करू:

- स्थानिक संस्कृतीची माहिती करून घेऊ, समूहातील अनुभवांच्या देवाणघेवाणीस प्रोत्साहन देऊ व स्वतःतही बदल करू आणि स्थानिक समुदायांसह आमच्या व्यवहारांत कल्पक आणि संवेदनशील राहू.
- प्रादेशिक आणि स्थानिक चिंता, रुढी आणि परंपरांचा मान राखू आणि त्या विचारात घेऊ.
- या संहितेमध्ये दिलेल्या लाचलुचपत व भ्रष्टाचार-विरोधी तत्वांच्या समावेशासह सर्व सार्वजनिक उपक्रमांमध्ये नैतिकतेने, स्थानिक कायदे आणि नियामकतांनुसार वर्तन करू.

### + अधिक माहिती

या तत्वांना आमच्या मानवाधिकार घोरणाचे समर्थन आहे.



# 07

## स्वारस्याचे संघर्ष

समूहाच्या सर्वोत्तम हिताची कृती करणे हे कर्मचारी, अधिकारी आणि संचालक यांचे कर्तव्य आहे आणि त्यांनी स्वतःला किंवा इतरांना वैयक्तिक लाभ होण्यासाठी त्यांच्या हुद्यांचा वापर करू नये किंवा समूहाच्या सर्वोत्तम हिताच्या विरुध्द काम करू नये. वैयक्तिक स्वारस्य जे समूहाच्या हितास बाधा आणते किंवा बाधा आणत असल्याचे भासू शकते ते किंवा आमच्या कर्तव्ये पार पाडण्यावर अयोग्य प्रभाव टाकते ते टाळले जायला हवे. स्वारस्याचे संघर्ष टाळणे नेहमीच शक्य नसते आणि त्यामुळे जिथे एखाद्या कर्मचार्याच्या किंवा त्यांच्या कुटुंबाच्या आणि कुटुंबाजवळच्यांच्या स्वारस्याचा समूहाच्या हिताशी संघर्ष निर्माण होतो किंवा जिथे असा संघर्ष निर्माण होण्याची लक्षणीय जोखीम आहे तेथे कर्मचार्याने तो संघर्ष किंवा संभाव्य संघर्ष त्वरीत आपल्या नजीकच्या व्यवस्थापकाकडे जाहीर करावा.

कर्मचारी हे कधीही करणार नाहीत:

- ज्या बाहेरच्या कंपन्या आमच्या समूहासह व्यवसाय करतात किंवा करू शकतील किंवा स्पर्धेत असतील अशा कंपन्यांबरोबर प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे व्यवसाय करणे, व्यवस्थापनाकडून आगाऊ मंजूरी असल्याखेरीज आर्थिक किंवा इतर संबंधांमध्ये समूहाच्या वतीने सहभागी होणे.
- व्यवस्थापनाकडून आगाऊ मंजूरी असल्याखेरीज अशा कोणत्याही व्यवहारामध्ये समूहाचे प्रतिनिधित्व करणे की त ज्यामध्ये त्यांचे किंवा संबंधित पक्षाचे कोणते तरी वैयक्तिक स्वारस्य आहे.
- समूहाबद्दलची, किंवा समूहाची किंवा व्यापार-सहयोगींची गोपनीय माहिती अयोग्यपणे उघड करणे किंवा अन्यथा वापरणे.
- समूहासह स्पर्धा करणे किंवा इतरांना स्पर्धा करण्यास मदत करणे.
- समूह व्यवस्थापनाकडून आगाऊ मंजूरी दिलेली असल्याखेरीज आणि समूहाच्या हिताशी त्या मंडळाचा संघर्ष नाही असे आढळल्याखेरीज कोणत्याही व्यावसायिक उद्योगाच्या बाह्य मंडळावर काम करणे.
- कोणत्याही व्यावसायिक सहयोग्याकडून किंवा स्पर्धकाकडून वैयक्तिक फायद्यासाठी पैसे घेणे किंवा मिळवण्याची धडपड करणे.
- कोणत्याही व्यावसायिक सहयोग्याकडून किंवा स्पर्धकाकडून अशा कोणत्याही पैसा-विरहित भेटवस्तू, सेवा किंवा अन्य गोष्टी स्वीकारणे की ज्या त्यांच्या स्वातंत्र्यावर किंवा व्यावसायिक निर्णयावर अयोग्य प्रभाव टाकणार्या असतील किंवा अयोग्यपणे तसा प्रभाव पडू शकणार असेल.

# 08

## स्पर्धक

आम्ही जोरदार स्पर्धा करू परंतु, प्रामाणिकपणे करू आणि बेकायदेशीर मार्गांनी स्पर्धात्मक फायदा मिळवू पाहणार नाही.

आम्ही हे करू:

- व्यापारदृष्ट्या संवेदनशील माहितीची (किंमती, क्षमता, उत्पादन, विक्रीचे प्रमाण, बाजारातील वाटा, व्यावसायिक धोरण किंवा किंमत यांच्या समावेशासह) आमच्या स्पर्धकांबरोबर कधीही देवाणघेवाण करणार नाही.
- अयोग्य मार्गांनी स्पर्धकाबाबत माहिती मिळविण्यापासून दूर राहू.
- निर्बंधात्मक किंवा संगनमताच्या व्यापार पध्दतींमध्ये सहभागी होणार नाही किंवा कोणत्याही बाजारपेठ स्थितीचा गैरफायदा घेणार नाही.
- आमच्या स्पर्धकांबाबत किंवा त्यांच्या उत्पादनांबाबत खोट्या किंवा दिशाभूल करणार्या टिप्पण्या किंवा दावे करण्याच्या समावेशासह अन्याय्य स्पर्धेमध्ये सहभागी होण्यापासून दूर राहू.

**+ अधिक माहिती**

या तत्वांना आमच्या स्पर्धा व भ्रष्टाचार-विरोधी धोरणांचे समर्थन आहे.

## आवाज उठवणे

या संहितेतील भाषा आणि भावार्थाच्या, कायद्याच्या किंवा कोणत्याही धोरणाच्या विरुध्द असलेल्या वर्तनाबाबत किंवा निर्णयांबाबत कोणत्याही चिंतांची व्यवस्थापनासह चर्चा करण्यासाठी कर्मचार्यांना प्रोत्साहन दिले जाते. तुम्हाला असलेल्या कोणत्याही चिंता कृपया तुमचे नजिकचे व्यवस्थापक, तुमच्या देशातील वरीष्ठ व्यवस्थापक किंवा कायदा विभागाच्या एखाद्या सदस्याकडे व्यक्त करा. स्वतः भेटून कळवलेल्या सर्व चिंता गोपनीयतेने हाताळल्या जातील.

त्याचबरोबर कंपनी एक स्वतंत्र, गोपनीय 24 -तास चालू असलेली कर्मचारी चिंता हेल्पलाईन आणि वेब-आधारीत सुविधा प्रदान करते ज्याद्वारे कर्मचारी कोणत्याही चिंता नोंदवू शकतात.

**चांगल्या भावनेने कळवलेल्या चिंतेबाबत कोणत्याही कर्मचार्याला कधीही दंड आकारला जाणार नाही किंवा त्याचा गैरफायदा घेतला जाणार नाही. आवाज उठवणाऱ्यांविरुध्द सूड घेणे सहन केले जाणार नाही.**

## ती अंमलात आणली जात असल्याची खात्री करणे


आम्ही आमचे व्यापार-व्यवहार हे नेहमी संहितेच्या तत्वांना अनुसरुनच केले पाहिजेत.अनेक प्रकरणांमध्ये यासाठी सूज्ञपणा वापरण्याची आवश्यकता असेल. संहितेचा अर्थ किंवा वाव-व्याप्ती ह्याबाबत तुम्हाला कधीही शंका असल्यास कृपया तुमच्या पर्यवेक्षकाचा किंवा इतर समूह अधिकार्याचा सल्ला घ्या.

या संहितेचे पालन न करण्याचे परिणाम वेसुविअस आणि कर्मचारी अशा दोघांसाठीही अतिशय गंभीर असू शकतात व त्यात, दंड, शिक्षा, नावलौकिकास नुकसान पोहोचणे आणि गुन्हेगारी दायित्व यांचा समावेश राहू शकेल. जेथेही या संहितेचे उल्लंघन झाल्याचा संशय असेल किंवा तसे ओळखले जाईल तेथे, योग्य तपास केला जाईल. जेथे लागू असेल तेथे, शिस्तभंगाच्या कारवाईसह नोकरीवरुन काढून टाकण्यापर्यंत किंवा त्यासह कारवाई केली जाईल.

या संहितेचा नियमितपणे आढावा घेतला जाईल. तिचे पालन कशा प्रकारे केले जात आहे त्यावरही आम्ही देखरेख करू. या संहितेवरील कोणत्याही टिप्पण्या ग्रुप जनरल काऊन्सलकडे पाठवल्या जाव्या.

## मला अधिक माहिती कुठे मिळेल ?

समर्थनात्मक धोरणांच्या प्रतींसह, अधिक माहितीसाठी, कृपया वेसुविअस इंटरनेटला भेट द्या किंवा कायदा विभागाच्या तुमच्या स्थानिक सदस्याचा सल्ला घ्या. संहितेची इलेक्ट्रॉनिक आवृत्ती येथे उपलब्ध आहे www.vesuvius.com.



VESUVIUS

Vesuvius plc
165 Fleet Street
London EC4A 2AE

T +44 (0)20 7822 0000
www.vesuvius.com

2019_Marathi